**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २५.०४.२०२६ शनिवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जुनी कामठी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी विजय भगवानदास झमतानी, वय ५७ वर्षे, रा. प्लॉट क्र. २०६, कल्पतरु कॉलनी, नवीन कामठी, नागपूर हे व्यापारी असून, ‘‘प्रो. भावेश सेल्स’’ या नावाने अग्रसेन चौक, गुळओली, कामठी, जि. नागपुर येथून कन्फेक्शनरी विक्री करतात. तसेच, कन्फेक्शनरी करीता साखरेचा व्यापार करतात. आरोपी क्र. १) राजु नेताजी मोरे, वय ३६ वर्षे, रा. मोरेमडा, बिरनबवाडी, सांगली २) रफीक बाबा शेख, वय ३९ वर्षे, रा. कुंभारगाव, करमाळा, सोलापुर ३) गजाला रफीक शेख, वय ४३ वर्षे, रा. ग्रॅज्युऐट पार्क, पुणे ४) मनोज बाबा शेख, वय ५१ वर्षे, रा. गणपती विसर्जन घाट, बालेवाडी, पुणे ५) ओमकार विनायक पोवार, वय ३७ वर्षे, रा. तासबाग, सांगली यांनी सुरूवातीला फिर्यादी यांनी मागणी केल्याप्रमाणे साखरेचा पुरवठा करून, फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादीचा आरोपींवर विश्वास बसल्याने फिर्यादी यांनी आरोपींना आणखी जास्त प्रमाणात सारखेची ऑर्डर दिली असता, आरोपीतांनी दिनांक २१.१०.२०२५ ते १०.०१.२०२६ चे दरम्यान, फिर्यादीकडून एकूण २,६२,२५,०००/—रू. घेऊन साखरेची आर्डर पाठवली नाही. तसेच, फिर्यादी यांनी आरोपीतांना आर्डर चे पैसे परत मागीतले असता, आरोपींनी कोणतीही रक्कम परत न करता व माल न देता टाळाटाळ करून, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन, त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. सागर भंडारी ९४०४१०८१७५ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी यांची आई नामे श्रीमती मंगला रामदासपंत केवटे, वय ७२ वर्षे, रा. फ्लॅट क्र. १४, हंसध्वनी अपार्टमेंट, धरमपेठ, नागपूर ह्या योगा टिचर असून, त्या गजानन महाराज मंदीर, झेंडा चौक येथे योगा क्लास घेत असत. दिनांक २५.०४.२०२६ चे ०६.१५ वा. ते ०६.३० चे दरम्यान, फिर्यादीच्या आई ह्या योगा क्लास घेण्याकरीता पायदळ जात असतांना, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील बारलिंगे चौक, सुगंध मंगल कार्यालय जवळ, सांजवात अपार्टमेंट समोरील रोडवर, धरमपेठ येथे पांढरे रंगाचे इनोव्हा कार क्र. सीजी ०७ डीसी ८६१६ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे आईला धडक देवुन पळुन गेला. अपघातात फिर्यादीच्या आई गंभीर जखमी झाल्या. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी लोचन रामदासपंत केवटे, वय ४७ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे मसपोनि. जोत्स्ना भावसार ८२७५७०५५३७ यांनी इनोव्हा कार चालकाविरूध्द कलम २८१,

१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे लकडगंज :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०४.२०२६ चे ११.५० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगा—जमुना सिमेंट रोड, डोकोमो गल्ली येथे सार्वजनिक ठिकाणी एक ईसम ज्याने अंगात काळ्या रंगाची टि—शर्ट व काळ्या रंगाचे लोअर घातलेले असून तो शस्त्रासह वावरत आहे. अशा माहितीवरुन लकडगंज पोलीसांनी तेथे जाऊन पाहणी केली असता, त्यांना प्राप्त वर्णनाचा ईसम दिसून आला. पोलीसांनी त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळून जावु लागला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव जुनेद अख्तर खान वय २० वर्षे रा. मोठा ताजबाग, सिंधीबन, पठाण पेट्रोल पंपसमोर, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे लोअरचे आत कंबरेत एक लोखंडी धारदार चाकू किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोअं. प्रभाकर मानकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. संदीप शिंदे ९८५०३४८७६३ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** अमोल भिमराव डोंगरे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १७, इंदोरा, मठ मोहल्ला, आंबेडकर चौक, जरीपटका, नागपूर हे दिनांक २२.०४.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे, अंगात— ग्रे रंगाचा शर्ट व पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख— दोन्ही डोळ्यांखाली जखमेचे निशान आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :—** सुरेश दौलत सोमकुंवर, वय ७४ वर्षे, रा. इंदोरा रिपब्लीकन नगर, गल्ली नं. ८, जरीपटका, नागपूर हे दिनांक १९.०४.२०२६ चे १३.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— टक्कल पडलेले काळे पांढरे, अंगात— हिरव्या रंगाचा टि—शर्ट व ग्रे रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.




अमोल सुरेश

## (ईतर)

### १) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/ साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०२७७ /२००३ | कलम ४२६ भा.दं.वि. | मुजीब अहमद खान रा. ३५ बी, रेल्वे अजनी, नागपुर | २९.०४.२०२६ |
| २ | मा. १८वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४०११७/ १९९६ | कलम ४२० भांदवि | बनबिहारी रुपकिशोर गांधी रा. ४०७, राहुल भवन, किराडपुरा, सुभाष पुतळा, नागपूर | २९.०४.२०२६ |
| ३ | मा. २ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, हिंगणघाट. | ६००२२८/ २०१४ | कलम ४५७, ३८० भांदवि | दीपक ओमप्रकाश सुर्यवंशी रा. लोहापुल झोपडपट्टी, हिंगणघाट. | २९.०४.२०२६ |

### २) पोलीस ठाणे तहसील येथील बेवारस वाहना बाबत वाहन मालकांना सुचना :—

पोलीस ठाणे तहसिल नागपुर शहर, येथे बेवारस (लावारिस विना दाव्याचे दुचाकी वाहने) दुचाकी वाहने जमा आहेत. खालील यादी प्रमाणे एकुण ०६ वाहने असुन, त्या वाहनाकरीता पो. ठाणे तहसिल येथे कोणीही दावा केलेला नाही, या वाहनाचे मालक अद्याप मिळुन आलेले नाही. नमुद दुचाकी वाहनांबाबत पुढील कारवाई करणे असल्याने, खालील यादीतील वाहनांचे मालकांनी पोलीस ठाणे तहसील येथे ०७ दिवसाचे आत येवुन, आपली वाहने घेवुन जावे. अन्यथा त्यांचे काहीही म्हणने नाही, असे गृहीत धरून यातील नमुद वाहनाबाबत लिलावाची प्रक्रीया करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | मालाचे विवरण | गाडी नंबर | **इंजीन नंबर / चेसिस नंबर** |
|---|---|---|---|
| ०१ | बजाज मोटार सायकल | खरा नं. MH-31 AB 898<br>खोटा नं. MH-31 AC 2254 | चेसिस नं. DBFBDK30018<br>इंजीन नं. DBFBDK34534 |
| ०२ | लुना काळ्या रंगाची | MH-31/7360 | — |
| ०३ | हीरो होंन्डा सिडी १०० | MH-31/C- 394 | — |
| ०४ | बजाज स्कुटर | MFWC- 4550 | — |
| ०५ | लुना | खोटा नं. MAG— ५६२९<br>खोटा नं. BTB—1010 | — |
| ०६ | हीरो होंन्डा सिडी १०० | MH-31/AD-8408 | — |
| ०७ | हीरो होंन्डा स्प्लेंडर सिडी १०० | MH-31/AK-7491 | — |
| ०८ | सुझुकी | विना नंबर प्लेट | — |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**